पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/७५८ /१६
पुणे १ दिनांक :- १६ / २ /२०१६

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
इन्फंट जिजस एज्युकेशन सोसायटी केशवनगर, पुणे संचलित इन्फंट जिजस प्रायमरी स्कूल, स.नं. ४९२/२ अ ,/१ बी, केशवनगर, कासारवाडी, पुणे

विषय:- सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे, तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत.

संदर्भ:- १) महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र १,६ व २४) २०१२
२)शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २० जून २०१२
३) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क. इमाशा-१७१४/प्र.क्र.२५०/एसएम-२, दि. ३१/५/२०१७
४) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. शिउसं/प्राथ-२/स्वयंअशाळा/मान्यता /पुवि/२०१७/४३८८ दि. १/७/२०१७

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार, शासनाने सन २०१० मध्ये जाहिरात देवून इंग्रजी माध्यमाच्या शाळा कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्याचे परिपत्रक काढले होते. तदनंतर महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ राज्यांत लागु झाल्या आहे. तथापि, सन २०१० मध्ये इंग्रजी माध्यमकरीता दाखल केलेल्या शाळांपैकी काही शाळा सन २०१० पासून राज्यात आजतागायत सुरु आहेत. सदर इंग्रजी शाळा हया बहुतांशपणे शहरी भागांत आहेत. त्यामुळे सदर शाळांना स्वयंअर्थसहाय्य तत्वावरील जागेबाबतच्या अटींचे पालन करणे आवघड होत आहे. सदर शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांना परिक्षा देण्याच्या अडचणी येत आहेत. या सर्व बाबी विचारात घेता व मा. न्यायालयाने दिलेले निर्देश विचारात घेता विदयार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ व बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ मधील तरतुदींची पुर्तता करणाऱ्या इंग्रजी प्राथमिक शाळांना स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर विशेष बाब म्हणून सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून वरील संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळा स्थापन करणेकरीता शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र. १ च्या पत्रानुसार नविन शाळा स्थापन करणेकरिता खालील अटी व शर्तीवर प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ |
| २ | इन्फंट जिजस एज्युकेशन सोसायटी केशवनगर, पुणे | इन्फंट जिजस प्रायमरी स्कूल, स.नं. ४९२/२ अ ,/१ बी, केशवनगर, कासारवाडी, पुणे | इंग्रजी | नवीन शाळा (राज्यमंडळ) | प्राथमिक इ १ ते ५ | स्वयंअर्थ सहाय्यित सन २०१६-१७ |

**अटी व शर्ती**

.१. संस्थेने शाळा परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ. मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
.२. शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
.३. या अधिनियमातील तरतुदीनूसार शाळा स्थापन करण्यास दिलेली परवानगी दिलेली आहे.
.४. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये सन २०१६-१७ मध्ये परवानगी देण्यात येत आहे.
.५. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत व्यवस्थापनाने शाळा सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
.६. परवानगी देण्यात आलेल्या नवीन शाळांना शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
.७. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी पात्र नवीन शाळा/वर्ग असे दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
.८ महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
.९. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ या अधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित शाळा/ वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)